Volume : 3 (2023)
Special Issue :1 (March)
LIBRARY SCHOLAR
International Peer-Reviewed Journal of Library Science
ISSN
2583-2549

# ग्रंथालय व माहितीशास्त्र शिक्षणाची अधिमान्यता

**श्रीमती. ज्योती रमेश यादव**
ग्रंथपाल,
बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी
Email: librarianjyotiyadav@gmail.com

---

**प्रस्तावना :**

शैक्षणिक गुणवत्तेचा आग्रह आणि त्यासाठी सातत्याने होणारे प्रयत्न ही गोष्ट नविन नाही. पाश्चात्य व पौर्वात्य देशात शैक्षणिक गुणवत्ता वृध्दिंगत व्हावी म्हणून पूर्वीपासून प्रयत्न होत आहेत. २१ व्या शतकामध्ये ज्ञानाला भांडवलाचे स्वरुप आलेले आहे. म्हणूनच या शतकात ज्ञानाधारीत अर्थव्यवस्था असे म्हणतात. अशा ज्ञानरुपी भांडवलाच्या आधारावर सध्या राष्ट्राचा विकास अवलंबून आहे. उच्च शिक्षीत विद्यार्थी आपले गुणवत्ता पुर्ण ज्ञान जागतीक बाजारपेठेत आज विकू शकतो. यासाठी त्यांच्याजवळ सर्वोत्कृष्ट गुणवत्ता असलेले ज्ञान असणे आवश्यक आहे.

देशाच्या विकासात शैक्षणिक गुणवत्ता हा महत्वाचा घटक आहे. त्यामुळे शैक्षणिकक्षेत्रात पारंपारिक ,कालबाहय असा निरुपयोगी भाग काढून त्यांच्या ठिकाणी व्यवसायला संधी देणारा ,आर्थिकदृष्टया परवडणारा आणि जागतिक स्पर्धेसाठी गुणवत्ता टिकवणारा भाग आणणे आवश्यक आहे.त्यासाठी देशातील विद्यापीठे , महाविद्यालये असा उच्च शिक्षण देणा—या संस्थांचे मुल्याकंन करुन उच्च शिक्षणाच्या गुणवत्ता वाढविण्याचे व ग्रंथालय आणि माहितीशास्त्र शिक्षणात अधिस्वीकृतीसाठी नॅक, ALA , IFLA, ACRL, ISO सारख्या समितीने चांगले कार्य केले आहे.

**अधिमान्यता : Accreditation**

- उच्च शिक्षण संस्थेचे शासन मान्य अशा संस्थेच्या / संघटनेच्या तज्ञ समितीकडून मूल्याकंनझाल्यानंतर त्यानुसार त्या संस्थेचा दर्जा ठरवून तो दर्जा प्रमाणात देऊन प्रमाणित करणे या दर्जा प्रमाणिकरणालाच अधिमान्यता म्हणतात .
- अमेरिकेतील Council for Higher Educaion Accreditation यांच्या www.chea.org ; वेबसाईटनुसार अधिमान्यता म्हणजे. The process of external quality review used in higher education scrutinize colleges and universities for quality assurance and quality improvement.
- wakipeida – Accrediation is a process in which certification of compentency, authority or credibity is presented.

**अधिमान्यतेची गरज :**

- शैक्षणीक गुणवत्ता वृध्दीसाठी
- संस्थेतील बलास्थाने व कुमकवत स्थाने याची माहिती घेण्यासाठी
- संस्थेची ध्येय धोरणे व उदिृष्टेपुर्ती होते का नाही हे पाहण्यासाठी ४. अभ्यासक्रमातील बदलावी अमंलबजावणी व्यवस्थीत होती की नाही तपासण्यासाठी
- अध्ययन आणि अध्यापनातील सुधारणा करण्यासाठी

- विद्यार्थीचा वादविवाद , गटचर्चा , सहभाग आहे का नाही पाहण्यासाठी
- प्रशासन कार्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी
- यवसायाभिमुख शिक्षणास प्रधान्य देण्यासाठी
- संस्थेचे आधुनिकीकरण करण्यासाठी
- संशोधन कार्यास प्रोत्साहन देण्यासाठी
- पायाभूत सेवा –सुविधा आहेत का नाहीत पाहण्यासाठी
- संस्थेच्या लौकीकात वाढ होण्यासाठी

**ग्रंथालय आणि माहितीशास्त्र शिक्षणक्रम :**

डब्लु.ए.बॉर्डन आणि ए.डि. डिक्कीन्सन यांनी ग्रंथालयाची सुरुवात भारतात प्रथम केली. इ.स. १९११मध्ये सयाजीराव गायकवाड यांनी बडोदा येथे पहिले ग्रंथालय प्रशिक्षण सुरु केले दृ इ.स.१९१५ मध्ये डिक्कीन्सन यांनी पंजाब विद्यापिठात पहिले ग्रंथालयशिक्षण सुरु केले. डॉ.एस आर.रंगनाथन यांनी १९२९ मध्ये मद्रास ग्रंथालय संघाच्या वतीने पहिले ग्रंथालय शास्त्र नियमित प्रमाणात कोर्स सुरु केला. तसेच १९३७मध्ये त्यानी प्रमाणपत्र कोर्स बदलून १वर्षाचा डिप्लोमा कोर्स आंध्रयुनिव्हर्सिटी , बनारस हिंदू युनिव्हर्सिटी आणि युनिव्हर्सिटी ऑफ दिल्ली याठिकाणी सुरु केले दिल्ली विद्यापिठातच डॉ. रंगनाथ यांच्या नेतृत्वाखाली १९४८ मध्ये पदव्युत्तर पदवी आणि संशोधनात्मक कार्यासाठी ग्रंथालय सुविधा देण्यात आल्या डॉ. रंगनाथन यांनी १९६५ ला डि.लिंब. हा कोर्स बंद करुन बी. लिंब सुरु केले . यानंतर १९९० पी. एन. कौला – १ समितीने अभ्यासक्रमाचा नमुना सुचविला २००१ ला डॉ. करिसिदप्प–२ समितीने ग्रंथालय व माहितीशास्त्रात माहिती तंत्रज्ञानाचा वापर यावर शिफारशी दिल्या . पारंपारीक विद्यपीठे आणि मुक्त विद्यापीठाद्वारे ग्रंथालय आणि माहितीशास्त्र शिक्षण दिले जाते .

**ग्रंथालय माहितीशास्त्र शिक्षणक्रमाचे सद्यस्थिती :**

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र शिक्षण विविध स्तरावर शिकविण्याचे कार्ये हाती घेतले आहे दृ अनेक संघटना, विद्यापीठ अनुदान आयोग, सी.डी.सी. या सर्वाच्या सहकार्याने शिक्षणाचे स्थर व स्वरुप कसे असावे याचे योगदान ग्रंथालय आणि माहितीशास्त्र शिक्षणाला लाभले. सद्या स्थितीत भारतात १२० विदयापीठात ग्रंथालय आणि माहितीशास्त्र शिक्षण दिले जाते. १२० विदयापीठात बी.लीब. ७८ विदयापीठात एम.लीब. (१ वर्षे )२१ विदयापीठात (२ वर्षे ) एम.
वाढ एकसमान नाही. या विदयापीठात चांगल्या सेवा इतर विदयापीठाच्या तुलनेने दिल्या जात नाहीत. ही अवस्था आपल्याला ग्रंथालय व माहितीशास्त्र अभ्यासाबददल गांभीर्याने विचार करायला लावते.

**ग्रंथालय आणि माहितीशास्त्र शिक्षणातील समस्या :**

१. **ग्रंथालय प्रशिक्षण केंद्राची वाढ :**

नविन ग्रंथालय प्रशिक्षण केंद्रात कोणत्याही प्रकारचा ताळमेळ नसल्यामुळे मुलभूत सोयी सुविधा नसलेले प्रशिक्षण केंद्र स्थापन मोठया प्रमाणात झालेले आहेत पण त्यांचा दर्जा चांगला नाही.

२. **अभ्यासक्रमात विविधता :**

कोणताही नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यापूर्वी कोणतीही अधिमान्यता भारतात घेतली जात नाही . त्यामुळे शिक्षणात वेगळेपणा निर्माण होत आहे.

३. **शिक्षणाच्या कालावधीत बदल :**

या शिक्षणक्रमाची स्वायत्ता ही विद्यापीठ स्तरावर असल्यामुळे शिक्षणाचा कालावधी वेगवेगळा आहे. काही विद्यापीठात बि. लिंब. एकवर्षाचे तर काही विद्यापीठात दोन वर्षाचे आहे. तसेच एम. लिब. शिक्षणाचे आहे.

४. **विद्यार्थी व शिक्षण गुणोत्तर :**

सध्या कोणत्याही संस्थेत विद्यार्थी व शिक्षण गुणोत्तर हे चुकीचे वापरले जात आहे.१९६५ च्या डॉ. रंगनाथन यांनी बी.लिब. साठी १० विदयार्थी ०१ शिक्षक एम.लिब. साठी ०५ विदयार्थी असे प्रमाण कोठेचे पाळले जात नाही. यामुळे शिक्षणाचा दर्जा घसरत चालेले आहे.

५. **असतोलपणा :**

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र शिक्षणक्रम चालविणा—या संस्था हया प्रवेश प्रक्रिया, अध्यापन पध्दती, गुणदान, मुल्यमापनाच्या, संशोधन प्रक्रिया यात विविधता निर्माण झाली आहे. प्रत्येक विदयापीठात मुल्यमापन वेगवेगळया पध्दतीने केले जाते. कांही ठिकाणी ८०० मार्काचे अभ्यासक्रम तर कांही ठिकाणी ९०० मार्काचा आहे. यामुळे व्यवस्थीत मुल्यमापन होत नसून असमतोलपणा निर्माण झालेला आहे.

**साधनसामुग्री व सुविधांचा अभाव :**

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र चालविणा—या संस्थाकडे चांगली इमारत, फर्निचर, अत्याधुनिक प्रयोगशाळा यांचा अभाव असतो. त्यामुळे चांगले शिक्षण या साधनसामुग्रीच्या अभावामुळे दिले जात नाही. तसेच अनेक संस्थेत हे ग्रंथालयच अस्त्विात नसते यामुळे क्रमिक पुस्तके,संदर्भग्रंथ,प्रात्याक्षिकसाधने यांचा संग्रह नसतो.

६. **माहिती तंत्रज्ञान प्रयोगशाळा :**

ब—याच संस्थाकडे संगणकच नसते. संगणकावरील रोतची कामे, इंटरनेट सेवा, ऑनलाईन, सीडीवरील माहितीशोधन इ. प्रात्यक्षिक ग्रंथपालांना घ्यावी लागतात. जर संगणकच नसेल तर विदयार्थ्यांना त्याचे ज्ञान मिळणार नाही.

७. **प्रशिक्षणाचा अभाव :**

यु.जी.सी. फार्मत तंत्रज्ञानाची माहिती व्हावी म्हणून रिफ्रेश प्रशिक्षाची सुविधा राबविली जाणे गरजेचे आहे. इंटरनेट क्वॉलिटी असेसमेंट होत नाही. त्यामुळे दररोज काय शिकविले. हे लक्षात राहत नाही.

**ग्रंथालय आणि माहितीशास्त्र शिक्षणक्रमाच्या अधिस्वुकृतिची स्थिती :**

भारतात ए. ल. ए. सारखी अदिमान्यता करणारी संस्था नसल्यामुळे १९८६ NAPLIS (Natioanl Policy of Liberary and Information System) या समितीने अशा संस्थेची गरज असल्याचे दर्शविले या समितीने ग्रंथालय आणि माहितीशास्त्र शिक्षणक्रमाचे मुल्यनिर्धारण करण्यासाठी ICALISE (Indian Counseling for Accreditation of Liabrary and Information Science Education) अमेरिकेतील ए.एल.ए. संस्थेसारखे मुल्यांकन आधिमान्यता परिषद स्थापन करण्याचे योजले आहे. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र आदिमान्यते बददल १९९४ मध्ये नागपुर येथे राष्ट्रीय स्थरावरिल परिषद घेण्यात आली.

National Board of Accreditation : .

AICTE ची मान्यता प्राप्त तंत्रशिक्षण संस्थेचा दर्जा राखण्यासाठी कांही विशिष्ट कालावधीनंतर केली जाणारी प्रक्रिया म्हणजे आधि मान्यता होय. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र शिक्षणाव्यतिरिक्त अभियांत्रिक आणि तंत्रज्ञान, औषध निर्माणशास्त्र,संगणक उपयोजन,व्यवस्थान इ. विषयांचा दर्जात्मक सुधारण्याच्या आधिमान्यतेसाठी AICTE (All India Council for Technical Education) नॅशलन बोर्ड ऑफ ॲक्रीडिटेशन ची सप्टेंबर 1994 मध्ये स्थापना केली. www.nba.aicte.org

**आंतरराष्ट्रीय स्थरावरील ग्रंथालय आणि माहितीशास्त्र शिक्षणक्रमाची अधिमान्यता :**

**ALA- American Library Association**

**अमेरिकन लायब्ररी असोशिऐशन :**

अमेरिकेत ग्रंथालय शिक्षण क्रमचा दर्जा उंचाविण्यासाठी १९२४ मध्ये एएलए ने बोर्ड ऑफ एज्यूकेशन फॉर लायब्ररीयनशिपची स्थापना केली. सदया अधिस्वीकृती समिती ही एएलए चा जबाबदार विभाग आहे. या विभागावर दोन वर्षासाठी १२ प्रतीनिधी कार्यकारी मंडळामार्फत निवडले जातात.

एएलल ने ग्रंथालय शिक्षणात घेतलेल्या निर्णयात कोणताही बददल न करता शासन तो निर्णय राबवतो. १९५१ अमेरिकेत या शिक्षण क्रमाचे नविन स्टॅर्डस तयार केली. यात पुन्हा १९७२ व १९९२ ला सुधारणा केली.

**यात सहा विभागानुसार दर्जा ठरविण्यात येतो.**

१. अभियान, उदिदष्टये आणि ध्येय
२. अभ्यासक्रम
३. शिक्षकवृंद
४. विदयार्थी
५. प्रशासकिय आणि आर्थिक पाठबळ
६. भौतिक सोई आणि संसाधने

**United Kingdom - युनायटेड किंगडम :**

इ.स. १९९८ ला इंग्लडमध्ये द इन्स्टिटयुट ऑफ इन्फॉमेशन सायंटीस्ट आणि लायब्ररी असोशिएशन यांच्या संयुक्त विदयमाने अधिस्वीकृती तयार केली जाते. या संस्थेवर ग्रंथालय क्षेत्रातील अनुभवी व्यक्तींची निवड केली जाते. खालील पाच निक ानुसार ग्रंथालयाचे मुल्यांकन केले जाते.

१. माहितीची निर्मीती, संप्रेषणआणि उपयोगिता
२. महिती व्यवस्थापन आणि संघटनात्मक संदर्भ
३. माहिती प्रणाली, माहिती संप्रेषण तंत्रज्ञान
४. माहिती पर्यावरण धोरण
५. व्यवस्थापन कौशल्य

**Australia ऑस्ट्रेलिया :**

१९९९ साली ऑस्ट्रेलियात ग्रंथालय आणि माहितीशास्त्रासाठी काही नॉर्मस तयार केले व त्या आधारे बनावट पदव्या दिल्या जावू नयेत. तसेच प्रमाणापेक्षा जास्त संख्या स्थापन होऊ नयेत याकडे लक्ष दिले जाते.

**राष्ट्रीय मूल्यमापन व अधिमान्यता परीषद :**

**NAAC-National Assessment and Acreditation council :**

नॅक ही संस्था स्वायत्त ( Autonomous ) असून विद्यापीठ अनुदान मंडळाने (University Grants Commission ) स्थापन केलेली आहे. या संस्थेचे मुख्य कार्यालय बंगलोर येथे आहे. या संस्थेचे उद्दिष्ट विविध त—हेच्या शैक्षणीक संख्यामधील शैक्षणीक गुणवत्तेची तपासणी करणे तसेच यथायोग्य मुल्याकंन करणे हे आहे. संस्थेअंतर्गत चालवीले जाणारे विविध अभ्यासक्रम , अभ्यासक्रमाची व्याप्ती , सखोलता हे लक्षात घेतले जाते. नॅकचा एकंदर दृष्टीकोन सर्व संस्थांच्या बाबतीत नि:पक्षपातीपणाचा आहे.

कालबाहय शिक्षण,संशोधनाचा खालावलेला दर्जा,जुनाट व निरुपयोगी अभ्यासक्रम, आधुनिकीकरणाचा अभाव,नवीन बदलास होणारा विरोध इ. होणारी घसरण थांबवून गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करण्याकरिता विदयापीठ अनुदान आयोगाने नॅकची स्थापना केली.नव्या शैक्षणिक धोरणानुसार केंद्रीय मनुषबळ विकास मंत्रालय आणि विदयापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली यांच्या संयुक्त पुढाकाराने उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आले.या समितीला दिलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार त्या समितीने भारतीय सर्व प्रकारच्या उच्च शिक्षण देणा—या संस्थाचे मुल्यमापन करण्यासाठी एक आराखडा तयार केला. त्यावर भारतात विविध ठिकाणी स्वतंत्र चर्चा सत्रे आयोजीत करुन त्यांचे अहवाल एकत्र करण्यात आले.

त्यानंतर १९९४ साली पुणे येथे पुणे विद्यापीठामध्ये देशातील सर्व विद्यापीठांच्या कुलगुरुंची एक व्यापक परीषद घेण्यात आली व तेथे मुळाच्या समितीने तयार केलेला आराखडा मसुदा व त्यावर ९ ठिकाणी झालेल्या चर्चाचे अहवाल यावर सखोल चर्चा करुन नॅक राष्ट्रीय मुल्याकन व अधिमान्यता परीषद या संस्थेची दि. १६ सप्टेंबर १९९४ रोजी बंगलोर येथे रीतसर स्थापना करण्यात आली .नॅकची स्थापना विद्यापीठ अनुदान कायदा , १९५६ च्या कायदयातील विभाग ३ च्या कलम १२ सीसीसी अन्वये करण्यात आली असून नॅक या संस्थेला संपूर्ण स्वायत्ता प्रदान करण्यात आली.

**नॅकची उदिदष्टये :**

१. उच्च शिक्षण संस्थाच्या कार्याचे व त्यांच्या अभ्यास क्रमाचे मूल्यमापन.
२. अध्यापन,संशोधन यांच्या गुणवत्ता वृध्दीला चालना देणे.
३. शैक्षणिक संस्थांना बदलत्या जागतिक संदर्भात त्यांची उदिदष्टये कोणती असावी याचे मार्गदर्शन करणे.
४. शैक्षणिक कार्य सर्वकंष गुणवत्ता वृध्दी व्हावे म्हणून शैक्षणिक कार्यसंस्कृती या क्षेत्रात निर्माण करणे.

नॅक संस्थेकडून उच्च शिक्षण संस्थेचे मूल्यमापन झाल्यानंतर त्या संस्थेचा दर्जा ठरवून तो नॅक प्रमाणित केला जातो. अशा दर्जा प्रमाणीकरणालाच अधिस्वीकृती म्हणतात. याच अर्थाने नॅकचे नामकरण राष्ट्रीय मुल्यांकन व अधिस्वीकृती परिषद असे करण्यात आले.एकदा नॅक मुल्यांकन झाल्यानंतर परत पाच वर्षानंतर पुर्नरमूल्यांकन करुन घ्यावे लागते.नॅक कडून संस्थेच्या मुल्यमापनासाठी कसोटया वारल्या जातात.

**India भारत :**

भारतात एएलए सारखी संस्था नसल्यामुळे ग्रंथालय शाळांचे प्रमाण वाढत आहे. या शाळांमध्ये कसल्याही मुलभूत सुविधा नाहीत. याठिकाणी फक्त व्यवसायीकरण झाले आहे.प्रॅक्टीकल लायब्ररियनशिप खूप कमी प्रमाणात होते. यासाठी मुल्यांकन समितीचा परवानगीशिवाय कुठलिही ग्रंथालय संस्था स्थापन केली जावू नये. यासाठी मुल्यांकन समीतीने काही

स्टॅंडर्स सांगितली आहेत. शाखा संख्या, प्रवेश प्रक्रिया, शिक्षण विदयार्थी प्रमाण,मुल्यांकन पध्दत ग्रंथालय व प्रयोग शाळेतील सुविधा, अध्यापनासाठी लागणारी साहित्य, आर्थिक व भौतिक सुविधा इ. तसेच यामध्ये सध्याच्या स्थितीत नसलेले पुर्ण एल.आय.एस. शिक्षण पध्दतीत युनिफॉर्मिटी वस्टॅंडडायझेशन आणण्यासाठी एल. आय. एस. वेळोवेळी रिव्हीजन करणे गरजेचे बनले आहे.

IFLA ने वार्षिक परिषद १९७६ मध्ये राष्ट्रीय वैदयकिय कॉन्सिलच्या धर्तीवर ग्रंथालयशास्त्र कॉन्सिलची निर्मीती भारत सरकारे करावी. याव्दारे संपूर्ण देशामध्ये ग्रंथालय आणि माहितीशास्त्र शिक्षणक्रमाबाबत एक वाक्यता निर्माण करावी हा ठराव पास केला १९९४ मध्ये नागपूर युनिव्हर्सिटीने भारतातील ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विदयाशाखेच्या अधिमूल्यांकनाबाबत यु. जी. सी. व्दारे राष्ट्रीय सेमिनार आयोजित केला.या त्याचे नामकरण Indian Council for ıccrediation of LIS Education (ICALISE) भारतातील ग्रंथालय आणि माहितीशास्त्र शिक्षण अधिमुल्यांकन समिती देऊन ही समिती अमेरिका आणि यु.के. यांच्या संघटनांच्या धर्तीवर भारतीय वैदयकिय कॉन्सिल कायदा असे सुचविले आहे.

आधिमान्यतेसाठी लागणा—या महत्त्वपुर्ण बाबी. —

१. **संस्थेची ध्येयधोरणे व उदिष्टे :**
ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अभ्यासक्रम चालविणा—या संस्थाचे ध्येय व उद्दिष्टे या क्षेत्राशी सुसंगत असावी लागतात.

२. **अभ्यासक्रम विषयक बाबी :**
यात मुल्यांकन करताना तेथे वेगवेगळया स्थारावरील ग्रंथालय शिक्षणक्रमाचे कोर्सचे अभ्यासक्रम तेथील प्राध्यपकांचा अभ्यासक्रम पुनर्रचनेत सहभाग, ते प्राध्यपक अभ्यासक्रम व्यवस्थित शिकवितात का ? हे पाहिले जाते.

३. **अध्यापन अध्ययनआणि मुल्यांकन :**
यात विदयार्थ्यांचा प्रवेश, विदयार्थी शिक्षण गुणोत्तर, आय.टी. लॅब, अध्यायनाच्या पध्दती, गृहपाठ दिले जातात का, नियमित वर्ग चालतात का? हे पाहिले जाते.

४. **विदयार्थी कल्याण व प्रगती :**
यात विदयार्थ्यांना दिले गेलेले करियर गायडंस,कल्याणकारी योजना माजी विदयार्थी संघटना, विदयार्थ्याना दिलेले स्कॉलरशीप हे पाहिले जाते.

५. **पायाभूत सुविधा :**
ग्रंथालय आणि माहितीशास्त्र शिक्षणक्रम ज्या ठिकाणी चालविले जातात.त्या संस्थेची जागा, इमारत, अभ्यासिकेची सुविधा, ग्रंथालय, इंटरनेट, ई—रिसोर्सस,वसतीगृह, संगणकाची सोय इ. ची पाहणी केली जाते.

६. **संघटन व व्यवस्थापन :**
कोणत्याही संस्थेच्या प्रगती संघटन व व्यवस्थापन जबाबदार असते. त्यानुसार ग्रंथालय आणि माहितीशास्त्र शिक्षण संस्थेचे व्यवस्थापन पारदर्शी असावी लागते. अनुदानातून मिळणारा पैसा संस्थेच्या प्रगतीसाठी वापरला जातो का याची पाहणी केली जाते.

७. **संशोधन सल्ला मसलत विस्तार करणे :**
या कसोटीमध्ये ग्रंथालय आणि माहितीशास्त्र महाविदयालयातील प्राध्यपक त्यांच्या क्षेत्रातील संशोधनात सहभागी आहेत.शोध निबंध सादर करतात का? त्यांनी सामाजिक कार्य या सर्वात सहभागी होतात का नाही हे पाहिले जाते.

८. **सुदृढ कार्यप्रणाली :**
या कसोटीत शैक्षणिक संस्थेत दररोज होणारे पाठ, प्राध्यपकांचा रजा, रजांची नोंदणी पाठांचे वेळागपत्रक, राबविलेली माहिती साक्षरता कार्यक्रम यांची पाहणी केली जाते.
अशा प्रमाणे ग्रंथालय आणि माहितीशास्त्र शिक्षणक्रमाची परिमाणे आहेत.

**अधिस्वीकृतीचीविषयक संस्थांच्या वेबसाईटस :—**

१. .chea.org

(Council for Higher Education Accreditation)

२. .qaa.ac.uk

(Academic standards & Quality of Higher Education in the UK)

3- www.inqaahe.nl

(International Network for Quality Assurance Agencies in Higher Education)

**सारांश :**

स्पर्धेत टिकण्यासाठी कोणत्याही संस्थेकडे गुणवत्ता असणे गरजेचे आहे.ही गुणवत्ता मुल्यमापन शिवाय ठरत नाही शैक्षणिक गुणवता ही देशाच्या विकासातील महत्त्वाचा घटक आहे. म्हणून शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी यूजीसीने नॅक स्थापन केला. अशा अधिस्वीकृतीच्या साहायाने ग्रंथालय आणि माहितीशास्त्राचे मुल्याकंन केल्यामुळे या क्षेत्रात गुणवत्ता वाढण्यास मदत होते.

**संदर्भ सूची :**

- कुरुप,एम.आर, २००२,नॅशनल ॲसेसमेंट ॲक्रिडटेशन ॲण्ड कॉनसिलची मुल्यामापन कसोटी,ज्ञानगंगोत्री अंक – २,सप्टे – ऑक्टों – पृ ५ –१२.
- प्रभुखानोलकर,राखी,२००४, राष्ट्रीय मूल्यमापन आणि अधिस्वीकृती परिषद : नॅक (उत्तरार्ध),ज्ञानगंगोत्री,अंक– ४, पृ. ३६–५३.
- प्रभुखानोलकर,राखी,२००४, राष्ट्रीय मूल्यमापन आणि अधिस्वीकृती परिषद : नॅक (पुर्वार्ध),ज्ञानगंगोत्री,अंक– ४३ पृ. २१–४०.
- वीर, धर्मराज, २००३, भारतातील ग्रंथालय आणि माहितीशास्त्र शिक्षण,ग्रंथपरिवार, ऑगस्ट पृ. १६–२६.
- Sarkhel J.K, 2006 Quality assurance and accreditation of LIS Education in Indian universities : Issues and Perspectives, In C.Khoo, D. Singh and A.S. Chaudhary (Eds) Proceedings of the Asia- pacific conference on library and information education and practice 2006(A- LIEP 2006 ), Singapor, 3- 6 April, PP- 427-431.
- Singh, S.P, 2003, Library and Information Science Education in India : Issues and Trends, Malaysian Journal of Library and information Science, V. 8 No. 2, Dec.pp- 1 -17.
- American Library Association. (2013). American Library Association handbook of organization. Chicago: American Library Association.
- Eden, B. L. (2018). The relevance of ala accreditation: An insider's view of the ALA committee on accreditation. In J. Percell, L. Sarin, P. Jaeger, & J. Bertot (Eds.), Advances in Librarianship (pp. 45–46). Emerald Group Publishing Ltd. doi:10.1108/ S0065-28302018000044A004.
- University Grants Commission. (2001). UGC Model Curriculum: Library and Information Science. New Delhi: UGC
- Sellen, M. (1991). Specialized accreditation and the library. Collection Building,

- 11(3), 2–8. doi:10.1108/eb023307
- Sellen, M. (1991). Specialized accreditation and the library. Collection Building,
- 11(3), 2–8. doi:10.1108/eb023307
- Sellen, M. (1991). Specialized accreditation and the library. Collection Building,
- 11(3), 2–8. doi:10.1108/eb02330
- Shawyun, T. (2010). Developing and actioning strategic planning in higher education
- institutions. Assumption University Press
- Sellen, M. (1991). Specialized accreditation and the library. Collection Building,
- 11(3), 2–8. doi:10.1108/eb02330